**३३) विशेष सर्वसाधारण सभा :**

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंहळाच्या आदेशानुसार केव्हाही अथवा मा.निंबधक यांचेकडील सुचना मिळालेपासून अथवा ३०० किंवा एकूण सभासदांमधील १/५ सभासदांच्या सह्याने आलेल्या लेखी विनंतीनुसार ३० दिवसांमध्ये विशेष सर्वसाधारण सभा बोलवतील. विशेष सर्वसाधारण सभेमध्ये फक्त सुचनेमध्ये दिलेल्या विषयांवर विचार केला जाईल.

**३४) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेची सुचना :**

१) वार्षिक सर्वसाधारण सभा १४ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सुचना देवून बोलावली जाईल.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसबरोबर उपस्थितीबाबतचे सही न केलेले सर्टिफिकेट पाठविले जाईल. सदर सर्टिफिकेटवर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी बँकेने नेमलेले अधिकृत अधिकारी सही करतील व असे सर्टिफिकेट उपस्थितीबाबतचा निर्णयाक पुरावा असेल.

३) विशेष सर्वसाधारण सभा ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सुचना देवून बोलावली जाईल.

४) वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना नोंदणीकृत कार्यालयात, नोटीस बोर्डवर तसेच बँकेच्या शाखांमध्ये लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, लेखापरिक्षकांचा मागील आर्थिक वर्षासंबधीचा अहवाल व संचालक मंडळाचा अहवाल यासहीत लावली जाईल. तसेच संचालक मंडळाची निवडणूक असल्यास त्यासंबधी व पोटनियम दुरुस्ती असल्यास त्यासंबधीची सुचना त्यासोबत लावली जाईल.

५) उपरोक्त सर्वसाधारण सभेची सुचना सामान्य व क्रियाशील सभासदांना पुढीलपैकी कोणत्याही एका पध्दतीने पाठविले जाईल.

अ) स्थानिक वाटप पध्दतीने किंवा

ब) पोस्टाने

क) ई-मेल द्वारे

ड) कुरिअरद्वारे

६) सर्वसाधारण सभेच्या सुचनेमध्ये सभेची जागा, तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. तसेच सुचनेमध्ये गणपूर्ती अभावी तहकूब झालेल्या सभेची तारीख, जागा व वेळ याचाही उल्लेख असला पाहिजे.

७) सर्वसाधारण सभेची सुचना मिळाली नाही, हे सभा तहकूब करण्यासाठी अथवा पुढे ढकलणेसाठी पुरेसे कारण ठरणार नाही.

८) सर्वसाधारण सभेची सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने दिली जाईल.